महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

## सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २

# मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६

**(दिनांक २२ एप्रिल २०१३ पर्यंत सुधारित)**

## Bombay Act No. II of 1906

# The Mamlatdar's Courts Act, 1906

***(As modified upto 22nd April, 2013)***

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामुग्री महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**2015**

**(किंमत : ६-००)**

# मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६

## अनुक्रमणिका

**उद्देशिका :**

**कलमे :**

१. संक्षिप्त नाव.
उर्वरित राज्यातील प्रारंभ.
२. सन १८७६ चा मुंबई अधिनियम ३ चे निरसन.
३. अर्थविवरण.
४. सहमामलेदार नेमण्याचा अधिकार.
सहमामलेदाराकडे दावे हस्तांतरित करण्याचा मामलेदाराचा अधिकार.
आयुक्ताकडे अधिकार सोपविणे.
५. मामलेदाराच्या न्यायालयाचे अधिकार.
मनाईहुकूम काढण्याचा अधिकार.
दावे सहा महिन्यांच्या आत दाखल करावयाचे.
दाव्याचे कारण.
६. दावे पाठविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.
७. वादपत्राअन्वये सुरू केलेले दावे.
वादपत्रातील मजकूर.
८. अनौपचारिक विनंती अर्ज वादपत्र मानणे.
९. वादीची शपथेवर तपासणी करणे.
१०. वादपत्रावर सही करणे व ते सत्यापित करणे.
११. मामलेदाराने शेरा लिहिणे वादीला लिहिता येत नसेल अशावेळी अनुसरावयाची कार्यपध्दती.
१२. वादपत्र नाकारणे.
१३. वादपत्र परत करणे.
१४. वादपत्र दाखल करून घेण्याजोगे असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपध्दती.
१५. साक्षीदारांनी हजर राहणे.
१६. वादी कसूर करील तेव्हा वादपत्र खर्चासहित फेटाळणे.
प्रतिवादी हजर न राहिल्यास प्रकरणाची एकतर्फी चौकशी करणे.
परंतु, पुरेसे कारण दाखविण्यात आले तर, प्रकरणाची फेरसुनावणी करता येईल किंवा वादीस त्याचा दावा काढून घेता येईल.
१७. कार्यवाही केव्हा तहकूब करता येईल.
१८. अज्ञान व्यक्तीस पक्षकार होता येईल.
अधिक पक्षकार सामील करून घेण्याचा अधिकार.
पक्षकार मरण पावेल अशाबाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती.

**अनुक्रमणिका**--समाप्त

१९. सुनावणीच्या वेळी मामलेदाराने निकालात काढावयाचे मुद्दे.
इतर साक्षीदारांची तपासणी घेण्याचा आणि वादग्रस्त मालमत्तेची तपासणी करण्याचा मामलेदाराचा अधिकार.
मामलेदाराने चालविलेल्या कार्यवाहीचे अभिलेख.
वादीच्या आणि प्रतिवादीच्या बाजुने झालेल्या निर्णयावर मामलेदाराने द्यावयाचे आदेश.
२०. मामलेदाराने दिलेला आदेश वादपत्रावर पृष्ठांकित करणे आणि तो खुल्या न्यायालयात वाचून दाखविणे.
२१. मामलेदाराचा निर्णय अंमलात कसा आणावा.
वाढणाऱ्या पिकाबाबत परंतुक.
मनाईहुकूम बजावण्याची पध्दत.
देण्यासंबंधी निर्णय दिलेल्या खर्चाची वसुली.
मनाईहुकूमाची अवज्ञा केल्याबद्दल शिक्षा कशी करावी.
२२. पक्षकारांच्या हक्कास बाध न येता कब्जा द्यावयाचा.
२३. अपिलास प्रतिबंध.
मामलेदाराने केलेल्या कार्यवाहीची फेरतपासणी करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.
जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार सोपवून देणे.
जिल्हाधिकारी हा न्यायालय आहे असे मानणे.
२४. (वगळण्यात आले).
२५. खोट्या वादपत्राचे सत्यापन करण्याबद्दल शिक्षा.
२६. विवक्षित दाव्यांना प्रतिबंध.
२७. निरसन आणि व्यावृति.
अनुसूची अ.
अनुसूची ब.
अनुसूची बब.
अनुसूची क.

**सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २**[१]
**[मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६]**††

[२९ ऑक्टोबर १९०६]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याद्वारे सुधारणा, अनुकूलन व रूपभेद करण्यात आले आहेत :--

सन १९२६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ (जेव्हा अधिसुचीत करण्यात आला तेव्हा).

सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

*सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

**मामलेदार न्यायालयाचे अधिकार आणि त्यांची कार्यपध्दती यासंबंधीचे कायदे एकत्रित करण्याबाबत व त्यात सुधारणा करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मामलेदार न्यायालयाचे अधिकार आणि त्याची कार्यपध्दती यासंबंधीचे कायदे एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे. प्रस्ताविक.

**१.** (१) या अधिनियमास, मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, उर्वरित राज्यातील प्रारंभ.

[२][(२) तो, मुंबई शहर वगळून, संबंध [३][महाराष्ट्र राज्यास] लागू असेल.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९०५ मुद्दा सात पृ. ५२० पहा. निवड समिती अहवालासाठी, १९०६, मुद्दा सात पृ. ५ पहा आणि परिषद कार्यवाहीसाठी १९०५, मुद्दा सात पृ. ५७८, १९०६, भाग सात, पृ. ३१ व पृ. १८९ पहा.

†† हा अधिनियम १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ च्या आरंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू होता त्या भागास, मुंबई शहर वगळून, तो लागू केला नाही (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम २ पहा.)

* हा अधिनियम निरसित करण्यात आला आणि त्याचे कलम २, १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२, कलम २ द्वारे पुन्हा अधिनियमित करण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (१) द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उर्वरित राज्यातील प्रारंभ †(३) मामलेदार न्यायालय (विस्तार) अधिनियम, १९५७, याद्वारे तो मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू करण्यात आला आहे त्या भागास तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास अंमलात येईल]. १९५८ चा मुंबई ४.

सन १८७६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ चे निरसन.

**२.** मामलेदार न्यायालय अधिनियम, १८७६ हा याद्वारे रद्द करण्यात आला आहे.

अर्थविवरण.

**३.** विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुध्द काही नसल्यास, या अधिनियमातील--

[१][(अअ) "जिल्हाधिकारी" यामध्ये उप आयुक्ताचा समावेश होतो ;]

(अ) "मामलेदार" या संज्ञेत [२][मामलेदाराच्या, महालकऱ्याच्या किंवा तहसिलदाराच्या किंवा नायब तहसिलदाराच्या] अधिकारांचा त्या त्या वेळी वापर करणाऱ्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याचा, आणि या अधिनियमाखाली मामलेदाराच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी [३][[४][राज्य] शासनाने] विशेषरित्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीचा त्यात समावेश होतो ; आणि

(ब) "वादी" व "प्रतिवादी" या संज्ञामध्ये --

(एक) अशा वादीच्या किंवा प्रतिवादीच्या वतीने काम करण्यासाठी योग्यरित्या नेमलेल्या वकीलाचा, आणि

(दोन) *दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ३७, यात व्याख्या केल्याप्रमाणे, ज्यास मान्यता दिली असेल अशा, वादीच्या किंवा प्रतिवादीच्या अभिकर्त्याचा समावेश होतो.

सहमामलेदार नेमण्याचा अधिकार.

**४.** (१) [३][[४][राज्य] शासनाच्या] [५][राजपत्रातील] अधिसूचनेद्वारे, कोणत्याही तालुक्यात, या अधिनियमान्वये सहमामलेदार नेमता येईल ; अशा सहमामलेदारास, मामलेदाराचेच समव्यापी अधिकार आणि समवर्ती क्षेत्राधिकार असतील मात्र तो, त्याच्याकडे मामलेदाराकडून येतील अशाच दाव्यांचा निकाल देईल. १९९७ चा १६.

---

† महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे पोट-कलम (३) फेरबदल विरहित ठेवण्यात आले.

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (२) (एक) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (२) (दोन) द्वारे 'मामलेदाराचे, मुखत्यारकाराचे, महालकऱ्याचे' या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "राज्यपाल परिषदेने" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारने" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "मुंबई शासन राजपत्रात" या मजकुराऐवजी "राजपत्रातील" हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा अधि. ५) पहा.

(२) कलम ७ अन्वये ज्याचे वादपत्र मामलेदारास सादर केले असेल अशा या अधिनियमाखालील कोणत्याही दाव्याचा निकाल करण्यासाठी तो, सहमामलेदाराकडे हस्तांतरण करण्याचा आणि अशा कोणत्याही दाव्याचा निकाल करण्यास, सहमामलेदार मृत्यू पावल्यामुळे, आजारीपणामुळे, किंवा कोणत्याही इतर कारणामुळे असमर्थ असेल तर तो स्वतःच्या दप्तरात पुन्हा दाखल करून घेण्याचा अधिकार मामलेदारास याद्वारे देण्यात आला आहे. सह मामलेदाराकडे दावे हस्तांतरित करण्याचा मामलेदाराचा अधिकार.

(३) [१][[२][राज्य] शासनास] पोट-कलम (१) खालील [३][त्याचे] अधिकार, [४][जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे] सोपविता येईल. आयुक्ताकडे अधिकार सोपविणे.

**५.** (१) प्रत्येक मामलेदार, मामलेदार न्यायालय म्हणून संबोधण्यात येईल अशा न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून काम करील, आणि त्यास, [५][राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येईल] अशा प्रादेशिक हद्दीत, कलम ६ आणि २६ यांच्या तरतुदींना अधीन राहून, पुढील बाबीसंबंधी अधिकार असतील,-- मामलेदाराच्या न्यायालयाचे अधिकार.

(अ) निश्चित जलमार्गाच्या नैसर्गिक प्रवाहात किंवा शेती, चराई, पिके किंवा झाडे यासाठी असलेल्या कोणत्याही जमिनीत किंवा तिला संलग्न असलेल्या कोणत्याही जमिनीत त्यामधून किंवा वरून पाणी स्वाभाविकपणे वहात असेल अशा त्या जमिनीच्या कोणत्याही पृष्ठभागावर, कायद्याच्या रीतसर प्राधिकाराव्यतिरिक्त इतर रितीने उभारलेला कोणताही व्यत्यय, त्यामुळे अशा कारणासाठी जमीन वापरण्यास, किंवा तीवर असलेल्या कोणत्याही अशा कुरणास, झाडास किंवा पिकास धोका पोहोचत असेल किंवा पोहोचण्याची शक्यता असेल तेव्हा तो व्यत्यय दूर करणे किंवा दूर करविणे ;

(ब) शेतीसाठी किंवा चरण्यासाठी किंवा झाडे किंवा पिके किंवा मासेमारीसाठी उपयोगात आणण्यात येत असलेल्या अशा कोणत्याही जमिनीपासून किंवा शेतीच्या कारणासाठी म्हणून उपयोगात आणण्यात येत असलेल्या कोणत्याही विहिरीच्या, तलावाच्या, कालव्याच्या किंवा स्वाभाविक किंवा कृत्रिम पाटाच्या पाण्याचा उपयोग करण्यापासून कायद्याच्या रीतसर प्राधिकाराव्यतिरिक्त इतर मार्गाने ज्या व्यक्तीकडून ताबा घेतला असेल किंवा जिला त्यापासून वंचित केले असेल त्या व्यक्तीस, किंवा मालमत्तेबाबत किंवा वापराबाबत दावा दाखल करण्याच्या पूर्वीच्या बारा वर्षांच्या मुदतीच्या आत, पूर्वीचा मालक किंवा अंशतः मालक नसेल अशा कोणत्याही इतर व्यक्तीच्या कोणत्याही कुळवहिवाटीची किंवा इतर हक्काची मुदत संपल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीस त्याचा ताबा मिळण्याचा अथवा तो पुन्हा स्थापित करण्याचा हक्क प्राप्त झाला असेल, त्या व्यक्तीस असा ताबा ताबडतोब देणे किंवा असा हक्क पुनःस्थापित करणे :

परंतु, कोणत्याही बाबतीत कोणत्याही अशा कुळवहिवाटीची किंवा इतर हक्काची मुदत संपली आहे याच केवळ कारणामुळे अशा कोणत्याही मालमत्तेचा ताबा मिळण्याचा किंवा असा

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "राज्यपाल परिषदेस" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकारास" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (३) द्वारे-- "आयुक्ताच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम २ (१) (एक) द्वारे "तात्काळ कब्जा देण्यास राज्य सरकार ठरवील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणताही वापर पूर्ववत होण्याचा हक्क ज्या व्यक्तीस प्राप्त झालेला असेल त्यास त्या मालमत्तेचा ताबा देणे किंवा तिचा वापर करण्याचा हक्क पूर्ववत करणे [१][किंवा असा कोणताही व्यत्यय दूर करणे किंवा दूर करविणे] अन्यायाचे किंवा गैरवाजवी कठोर होईल असे मामलेदारास वाटेल तर, किंवा असे प्रकरण दिवाणी न्यायालयच अधिक योग्य रीतीने हाताळू शकेल असे त्यास वाटेल तर, त्यास स्वविवेकानुसार, उपरिनिर्दिष्ट अधिकार वापरण्यास नकार देता येईल, परंतु तो असा नकार देण्याबाबतची कारणे लेखी नमूद करील.

मनाईहुकूम काढण्याचा अधिकार.

(२) [२][जेथे पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही व्यत्यय निर्माण करण्यात आला असेल किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असेल किंवा] शेतीसाठी किंवा चराईसाठी किंवा झाडे किंवा पिके किंवा मासेमारी यासाठी एखाद्या जमिनीचा किंवा जागेचा वापर करीत असलेल्या किंवा कोणतीही विहीर, तलाव, कालवा यांचे पाणी किंवा नैसर्गिक किंवा कृत्रिम जल प्रवाहाचे शेतीच्या कारणासाठी वापरावयाचे पाणी वापरीत असलेल्या किंवा रस्त्यांचा किंवा जेथे जाण्याच्या वहिवाटीच्या वाटांचा वापर करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, कोणतीही व्यक्ती कायद्याच्या रीतसर प्राधिकाराव्यतिरिक्त इतर मार्गाने त्रास देईल किंवा अडथळा आणील किंवा त्रास देण्याचा किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न करील तर, [३][कोणताही असा व्यत्यय निर्माण करणाऱ्या किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या किंवा] असा त्रास देणाऱ्या किंवा अडथळा आणणाऱ्या किंवा तसा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीस तसे करण्यास मनाई करणारा आदेश देण्याचा किंवा त्यास [४][असा कोणताही व्यत्यय निर्माण करण्यापासून किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यापासून किंवा] असा आणखी त्रास देण्यापासून किंवा अडथळा आणण्यापासून परावृत्त करणारा आदेश, उक्त न्यायालयास, त्या तरतुदींना अधीन राहून उक्त मर्यादांच्या आत राहून देण्याचा अधिकार असेल.

दावे सहा महिन्यांच्या आत दाखल करावयाचे.

(३) दाव्याचे कारण उद्‌भवल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत केलेला नसेल असा कोणताही दावा मामलेदार न्यायालय दाखल करून घेणार नाही.

दाव्याचे कारण.

(४) ज्या दिनांकास [५][पृष्ठभागावरून वाहणाऱ्या पाण्याच्या स्वाभाविक प्रवाहास व्यत्यय आणला असेल किंवा] कुळवहिवाटीचा किंवा इतर हक्कांचा ताबा काढून घेतला असेल किंवा त्याला वंचित केले असेल किंवा तो समाप्त झाला असेल किंवा ज्या दिनांकास [६][व्यत्यय], त्रास किंवा अडथळा सुरू झाला असेल, किंवा [७][व्यत्यय, किंवा] त्रास किंवा अडथळा करण्याचा प्रयत्न झाला असेल त्या दिनांकास दाव्याचे कारण उद्‌भवले असे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.--**कोणत्याही संयुक्त मालकास, संयुक्त मालमत्तेवर जो कोणताही हक्क असेल तो हक्क त्याने वापरला असता, या कलमाच्या अर्थानुसार, दुसऱ्या संयुक्त मालकाचा किंवा मालकांचा ताबा काढून घेतला किंवा त्याच्या किंवा त्यांच्या ताब्यास त्रास निर्माण केला असे होणार नाही.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम २ (१) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २ (३) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २ (३) (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २ (३) (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## उदाहरण एक

**अ** त्याचे शेत एक किंवा अधिक वर्षांच्या विशिष्ट मुदतीकरिता कसण्यासाठी **ब** ला खंडाने देतो. **ब** ती मुदत संपल्यानंतर ताबा देण्यास नकार देतो. दावा दाखल करण्यापूर्वीच्या बारा वर्षांच्या मुदतीत **ब** हा त्या मालमत्तेचा पूर्वीचा मालक किंवा अंशतः मालकी असलेली व्यक्ती नसेल किंवा अशा मालकाचा किंवा अंशतः मालकी असलेल्या व्यक्तीचा वैध प्रतिनिधी नसेल तर, उक्त मुदत संपल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी, **अ** हा मामलेदाराच्या न्यायालयात, ताबा मिळविण्यासाठी दावा दाखल करू शकेल.

## उदाहरण दोन

**ब** हा **अ** चे वार्षिक कूळ आहे. [१][वार्षिक कुळवहिवाट संपविण्यासंबंधीच्या कायद्यास अनुसरून] उक्त जमीन सोडून देण्याची नोटीस कुळवहिवाटीचे चालू वर्ष संपण्याच्या पूर्वी **अ** हा **ब** ला देतो. पुढील वर्षाच्या सुरुवातीपासून जमीन सोडून देण्यास **ब** नकार देतो. दावा दाखल करण्यापूर्वीच्या बारा वर्षांच्या मुदतीत **ब** हा त्या मालमत्तेचा, पूर्वीचा मालक किंवा अंशतः मालकी असलेली व्यक्ती, किंवा अशा मालकाच्या किंवा अंशतः मालकी असलेल्या व्यक्तीची वैध प्रतिनिधी नसेल तर, ते वर्ष सुरू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी, **अ** हा मामलेदाराच्या न्यायालयात **ब** वर दावा दाखल करू शकेल.

## उदाहरण तीन

**अ** हा त्याच्या विहिरीच्या किंवा पाटाच्या पाण्याचा विशिष्ट मुदतीकरिता उपयोग करण्याची परवानगी **ब** ला देतो. ती मुदत संपल्यावर **ब** हा, **अ** च्या संमतीवाचून, त्या विहिरीतून किंवा पाटातून पाणी घेण्याचे चालू ठेवतो. दावा दाखल करण्यापूर्वीच्या बारा वर्षांच्या मुदतीत **ब** हा त्या पाण्याच्या उपयोगाचा, पूर्वीचा मालक, किंवा अंशतः मालकी असलेली व्यक्ती किंवा अशा मालकाचा किंवा अंशतः मालकी असलेल्या व्यक्तीची वैध प्रतिनिधी नसेल तर, **अ** ला **ब** ने पाणी घेण्याचे बंद करावे म्हणून मनाईहुकूम मिळविण्यासाठी **ब** वर ती मुदत संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत मामलेदाराच्या न्यायालयात दावा दाखल करता येईल.

## उदाहरण चार

**अ** आणि **ब** यांच्या जमिनी पाटाच्या किंवा फांसाच्या, किंवा तशाच प्रकारच्या पाण्याच्या कृत्रिम प्रवाहाशी संलग्न असून त्याचा उपयोग फक्त **अ** हा एकटाच आजपर्यंत करीत आला आहे. **अ** त्यातून पाणी घेतो. **अ** ला तसे करण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, मनाईहुकूम मिळविण्यासाठी, **ब** ला **अ** ने ते पाणी घेण्यास सुरूवात केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी, दावा दाखल करता येईल.

दावे पाठविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

**६.** जिल्हाधिकाऱ्यास, उभय पक्षांना योग्य नोटीस दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्याच्या जिल्ह्यातील कोणत्याही मामलेदाराच्या न्यायालयातून कोणताही दावा, त्याच्या जिल्ह्यातील दुसऱ्या कोणत्याही मामलेदाराच्या न्यायालयाकडे पाठविता येईल आणि ज्या मामलेदाराच्या न्यायालयाकडे तो दावा त्याप्रमाणे पाठविला असेल, तो त्यानंतर अशा दाव्यात क्षेत्राधिकार वापरील ; परंतु कलम २१ द्वारे ग्राम अधिकाऱ्यांना दिलेला कोणताही आदेश तो ग्राम अधिकारी ज्या मामलेदारास अधीन असेल तो मामलेदार देईल.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (४) (दोन) द्वारे "कलम ८४ अन्वये" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "तीन महिने" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

वादपत्राअन्वये सुरू केलेले दावे.
वादपत्रातील मजकूर.

**७.** या अधिनियमाखालील सर्व दावे, वादपत्रावरून सुरू होतील, आणि ती वादपत्रे वादी, न्यायालय चालू असताना मामलेदारास सादर करील, आणि त्यात पुढील तपशील असेल :--

(अ) वादीचे नाव, वय, धर्म, जात, व्यवसाय आणि राहण्याची जागा ;

(ब) प्रतिवादीचे नाव, वय, धर्म, जात, व्यवसाय आणि राहण्याची जागा ;

[१][(बब) निर्माण करण्यात आलेल्या व्यत्ययाचे स्वरूप आणि ठिकाण व एकमेकास लागून असलेल्या जमिनीचे ठिकाण आणि जी दाद मागितलेली असेल तिचे स्वरूप ;]

(क) ज्या मालमत्तेचा ताबा किंवा उपयोग करण्यासाठी मागणी केली असेल तिचे स्वरूप आणि ठिकाण किंवा, यथास्थिति, द्यावयाच्या मनाई हुकूमाचे स्वरूप.

(ड) वादकारण उद्‌भवल्याचा दिनांक ;

(ई) वादकारण उद्‌भवल्यास कारणीभूत झालेली परिस्थिती ; आणि

(फ) वादीचे दस्तऐवज, कोणतेही असल्यास, त्यांची आणि त्यांचे साक्षीदार, कोणतेही असल्यास त्यांची प्रत्येक साक्षीदाराकडून कोणत्या पुराव्याची आवश्यकता आहे ते दर्शविणारी, आणि कलम १४ अन्वये निश्चित करावयाच्या दिवशी आणि जागी, अशा साक्षीदारांनी हजर राहण्याकरिता त्यांना समन्स काढून बोलवावयाचे आहे किंवा वादी त्यांना त्या दिवशी आणि त्या जागी हजर करणार आहे ते दर्शविणारी सूची.

अनौपचारिक विनंती अर्ज वादपत्र मानणे.

**८.** वादपत्राच्या नमुन्यात नसलेला असा विनंती अर्ज मामलेदारास सादर करण्यात येईल, आणि त्याचा वाद विषय कलम ५ च्या कक्षेत येतो असे दिसून येईल तेव्हा, मामलेदार, या अधिनियमान्वये मिळण्याजोग्या सहाय्याचे स्वरूप तो विनंती अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीस स्पष्ट करून आणि विनंती अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीस त्याअन्वये सहाय्य मिळविण्याची इच्छा आहे किंवा कसे याबाबत चौकशी करील. अशा प्रकारचे सहाय्य मिळविण्याची इच्छा विनंती अर्ज करणारी व्यक्ती व्यक्त करील तर मामलेदार, विनंती अर्जावर तशी इच्छा असल्याबद्दल शेरा मारील, आणि त्यानंतर तो अर्ज, कलम ७ अन्वये सादर केलेले वादपत्र आहे असे मानण्यात येईल.

वादीची शपथेवर तपासणी करणे.

**९.** कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेला तपशील वादपत्रात नसेल आणि त्यात अनावश्यक मजकूर असेल तेव्हा मामलेदार, वादीची ताबडतोब शपथेवर तपासणी करील आणि कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेला, त्या वादपत्रात स्पष्टपणे आणि बरोबर दाखल केलेला नसेल असा तपशील त्याच्याकडून निश्चित करून येईल आणि ती तपासणी, त्या वादपत्रावरील शेरा किंवा त्याचे जोडपत्र म्हणून लेखी स्वरूपात ठेवील व त्यानंतर तो वादपत्राचाच भाग असल्याचे मानण्यात येईल. कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेला तपशील मिळविण्यासाठी वादीला मुदतीची जरूरी असेल तेव्हा मामलेदार, सर्व परिस्थितीचा विचार करून वाजवी वाटेल अशी मुदत त्याला देईल.

वादपत्रावर सही करणे व ते सत्यापित करणे.

**१०.** वादपत्र सादर करण्यात आल्यावर आणि आवश्यक असल्यास त्यासंबंधी कलम ९ मध्ये निर्दिष्ट केलेली तजवीज करण्यात आल्यावर मामलेदार, वादीस त्या वादपत्रावर स्वतःच्या समक्ष खुल्या न्यायालयात सही करण्यास आणि त्यासंबंधाने पुढील पद्धतीप्रमाणे, किंवा तशाचप्रकारे सत्यापित करण्यात फर्मावील :--

"मी, **अ, ब,** वादी, असे जाहीर करतो की, या वादपत्रातील मजकूर माझ्या पूर्ण माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा आहे".

मामलेदाराने शेरा लिहिणे.

**११.** (१) वादपत्रावर योग्य रीत्या सही केली आहे आणि ते सत्यापित केले आहे अशा अर्थाचा शेरा मामलेदार त्यावर लिहील.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ३ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(२) वादीला लिहिता येत नसेल तेव्हा, वादपत्रासंबंधीचे सत्यापन त्याच्या वतीने खुल्या न्यायालयात लिहून घेता येईल, आणि त्या वादपत्राच्या सत्यापनाबद्दल तो त्याच्या नावाजवळ त्याची निशाणी करील आणि अशा बाबतीत, वादीच्या विनंतीअन्वये माझ्या समक्ष सत्यापन करून दिले आहे आणि वादीने त्याची निशाणी माझ्या समक्ष केली आहे असे मामलेदार नमूद करील.

वादीला लिहिता येत नसेल अशा वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१२.** (अ) कलम ९ अन्वये शपथ घेऊन निवेदन करण्याचे वादी नाकारील अशा बाबतीत ; किंवा

वादपत्र नाकारणे.

(ब) वादी कलम ९ खाली शपथेवर निवेदन करण्यास तयार असेल किंवा त्याने तसे निवेदन केलेले असेल, मात्र तो कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेले तपशील, कलम ९ अन्वये ठरविलेल्या मुदतीत किंवा एकंदरीत सादर करण्यात कसूर करील तेव्हा ; किंवा

(क) वादपत्रांतील वरवरच्या मजकुरावरून असे दिसून येईल की,--

(एक) दावा केलेली मालमत्ता किंवा वापर कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारापैकी नाही, किंवा

(दोन) वादकारण वादपत्र सादर करण्यापूर्वी सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपूर्वी उद्‌भवलेले होते तेव्हा ; किंवा

(ड) कलमे १० आणि ११ अन्वये वादपत्रावर आवश्यक असलेली सही करण्यास किंवा ते सत्यापित करण्यास वादी नकार देईल, तेव्हा मामलेदार वादपत्र नाकारू शकेल.

**१३.** वादपत्राचा विषय आपल्या क्षेत्राधिकारातील नाही असे मामलेदारास वाटेल तेव्हा, तो वादपत्र योग्य न्यायालयात पाठविण्याकरिता परत पाठवील.

वादपत्र परत करणे.

**१४.** (१) वादपत्र दाखल करून घेण्याजोगे असेल तेव्हा, मामलेदार, ते स्वीकारून दाखल करील. त्यानंतर तो त्या प्रकरणाच्या न्यायचौकशीसाठी सोईस्कर दिवस आणि जागा ठरवील आणि **अनुसूची अ** च्या नमुन्यातील नोटीस, वादीच्या खर्चाने, प्रतिवादीस देईल. त्यानंतर तो ठरविलेल्या दिवशी आणि ठरविलेल्या जागी, वादीस त्याचे दस्तऐवज, कोणतेही असल्यास ते, आणि साक्षीदार कोणतेही असल्यास ते, घेऊन हजर राहण्यास फर्मािवल.

वादपत्र दाखल करून घेण्याजोगे असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

(२) प्रकरणाच्या न्यायचौकशीसाठी ठरवावयाचा दिनांक हा मामलेदार स्वतःच्या सहीने पुरेसे कारण लेखी नमूद केले असेल ते खेरीजकरून, नोटीस दिल्याच्या दिवसापासून दहा दिवसांच्या आधीचा किंवा पंधरा दिवसानंतरचा नसावा.

(३) प्रकरणाची न्यायचौकशी करण्यासाठी ठरवावयाची जागा ही, मामलेदाराच्या कार्यालयात किंवा ज्या ठिकाणी विवाद उद्‌भवला असेल तेथे किंवा त्याच्याजवळ किंवा जी जागा उभयपक्षकारांना सोईची होईल असे मामलेदाराला वाटेल अशा कोणत्याही इतर ठिकाणी ठरविता येईल.

**१५.** (१) कोणत्याही साक्षीदारास, ठरविलेल्या दिवशी आणि ठरविलेल्या जागी, हजर राहण्यासाठी समन्स काढून बोलाविणे आवश्यक आहे असे कोणत्याही पक्षकारास वाटेल तर मामलेदार त्या प्रयोजनाकरिता समन्स काढील.

साक्षीदारांनी हजर राहणे.

(२) जर असा कोणताही साक्षीदार अशावेळी हजर राहण्यास कसून करील ; आणि त्या समन्स नुसार त्याला हजर राहणे शक्य होईल अशा योग्यवेळी ; ते समन्स त्याच्यावर बजावण्यात आले होते असे सिद्ध झाले तर आणि अशा कसुरीबद्दल वाजवी सबब सांगण्यात आलेली नसेल तर, मामलेदारास कारणे लेखी नमूद करून, त्या साक्षीदारास अटक करण्याबद्दलचे अधिपत्र (वॉरंट) काढता येईल.

(३) याप्रमाणे साक्षीदारास हजर राहण्यास भाग पाडल्याबद्दल होणाऱ्या खर्चाचे नियमन, दुय्यम दिवाणी न्यायालयात साक्षीदारांनी हजर राहण्याबाबत त्या त्या वेळी जे नियम अमलात असतील त्या नियमांनुसार करण्यात येईल.

वादी कसूर करील तेव्हा वादपत्र खर्चासहित फेटाळणे.

**१६.** (१) वादी ठरविलेल्या दिवशी आणि ठरविलेल्या जागी हजर राहण्यात किंवा त्याचे दस्तऐवज, कोणतेही असल्यास सादर करण्यास, किंवा साक्षीदार कोणतेही असल्यास हजर राहण्यासाठी उपाययोजना करण्यात कसूर करील तर, प्रतिवादीने दावा मान्य केलेला असेल त्याव्यतिरिक्त मामलेदार, वादपत्र खर्चासहित फेटाळील मग त्यावेळी प्रतिवादी हजर असो किंवा नसो.

प्रतिवादी हजर न राहिल्यास प्रकरणाची एकतर्फी चौकशी करणे.

(२) कलम १४, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे वादी हजर राहील, परंतु प्रतिवादी हजर राहण्यास चुकेल आणि प्रतिवादीवर नोटीस योग्यरीतीने आणि नोटीशीत ठरविलेल्या दिवशी प्रतिवादीस हजर राहता येईल व जबाब देता येईल अशा पुरेशा वेळात बजाविलेली आहे असे त्याच्यापुढे आलेल्या पुराव्यावरून समाधानकारकरीत्या मामलेदारास वाटेल तेव्हा त्याने वादपत्राच्या चौकशीचे कामकाज आणि निर्णय एकपक्षीय केला पाहिजे :

परंतु पुरेसे कारण दाखविण्यात आले तर प्रकरणाची फेरसुनावणी करता येईल किंवा वादीस त्याचा दावा काढून घेता येईल.

परंतु, प्रथमतः पोट-कलम (१) अन्वये वादपत्र फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून किंवा पोट-कलम (२) अन्वये एकतर्फी निर्णय दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, दोन्हीपैकी कोणताही पक्ष, काही अपरिहार्य कारणास्तव त्यास, हजर राहता आले नाही किंवा, यथास्थिति, दस्तऐवज सादर करता आले नाहीत किंवा त्याच्या साक्षीदारांनी हजर राहण्याबाबत उपाययोजना करता आल्या नाहीत असे मामलेदारास समाधानकारकरीत्या पटवून देईल तर मामलेदाराने अर्जदाराच्या खर्चाने प्रतिपक्षास **अनुसूची 'ब'** मधील नमुन्यात नोटीस देणे, आणि प्रतिपक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरही अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे त्याला हजर राहण्यास खरोखरच प्रतिबंध झाला अशी मामलेदाराची खात्री होईल तर, त्याने तो तेव्हा ठरवील अशावेळी आणि अशा जागी त्या प्रकरणाची फेरसुनावणी करणे हे विधिसंमत असेल :

परंतु आणखी असे की, पूर्वगामी कोणत्याही तरतुदींमुळे वादीला प्रतिवादीचा खर्च देऊन आपला दावा काढून घेण्यास प्रतिबंध होणार नाही.

कार्यवाही केव्हा तहकूब करता येईल.

**१७.** (१) कलम १६, पोट-कलम (२), मध्ये नमूद केलेल्या बाबतीत, नोटिशीत ठरविलेल्या दिवशी प्रतिवादीस हजर राहता व जबाब देता येईल अशा पुरेशा वेळात ती योग्यरीतीने त्यावर बजावली आहे याबाबत मामलेदाराचे त्याच्यापुढे आलेल्या पुराव्यावरून समाधान झाले नाही तर, तो सुनावणी तहकूब करील आणि कलम १४, पोट-कलम (१) अन्वये प्रतिवादीला नवीन नोटीस देईल.

(२) ज्याला योग्यरीत्या समन्स काढले असेल किंवा कलम १५, पोट-कलम (२) अन्वये ज्याला अटक करण्याबाबत अधिपत्र (वॉरंट) काढण्यात आलेले असेल असा कोणताही साक्षीदार, ठरविलेल्या दिवशी आणि ठरविलेल्या जागी हजर राहण्यास कसूर करील तर मामलेदारास, त्याच्यापुढे आलेल्या पुराव्यावरून तसे करण्यास पुरेसे कारण आहे असे वाटले तर, अशा साक्षीदारास हजर राहण्यास भाग पाडण्यात येईतोपर्यंत त्या दाव्याची सुनावणी वेळोवेळी तहकूब करता येईल.

(३) मामलेदारास, कोणत्याही इतर पुरेशा कारणासाठी कारणे लेखी नमूद करून, त्याला योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत दाव्याच्या न्यायचौकशीचे काम तहकूब ठेवता येईल. परंतु अशी मुदत दहा दिवसांहून अधिक असणार नाही.

(४) कलमे १५ आणि १६, च्या तरतुदी, या कलमान्वये दाव्याची न्यायचौकशी ज्या दिवसापर्यंत तहकूब केलेली असेल त्या कोणत्याही दिवसाच्या बाबतीत, जणूकाही तो दिवस त्या दाव्याच्या न्यायचौकशीसाठी मूलतः ठरविलेला दिवस असल्याप्रमाणे लागू असतील.

**१८.** (१) अज्ञान व्यक्तीचे प्रतिनिधित्व जर नैसर्गिक पालकाकडून किंवा योग्यरीतीने नेमलेल्या पालकांकडून करण्यात येत असेल तर, त्याला किंवा त्याच्याविरुद्ध दावा दाखल करता येईल. अज्ञान व्यक्तीस पक्षकार होता येईल.

(२) मामलेदारास, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दावा केलेली मालमत्ता किंवा वापर याचा किंवा याच्या कोणत्याही भागाचा कब्जा किंवा भोगवटा ज्या कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित केलेला असेल त्या व्यक्तीचे नाव किंवा, न्यायालयास वाद विषयाचा निवाडा परिणाम क्षमतेने आणि संपूर्णपणे करण्यासाठी ज्या व्यक्तीला पक्षकार म्हणून सामील करून घेणे आवश्यक असेल त्या व्यक्तीचे नाव, दाव्याच्या परिस्थितीनुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे वादी किंवा प्रतिवादी म्हणून सामील करुन घेण्याबाबत आदेश देता येतील : अधिक पक्षकार सामील करून घेण्याचा अधिकार.

परंतु, कोणत्याही व्यक्तीला तिच्या संमतीवाचून वादी म्हणून सामील करून घेण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, अशाप्रकारे सामील करून घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, दावा अनिर्णीत असताना ती हस्तांतरीत नसेल तर, कलम ५, पोट-कलम (३) च्या प्रयोजनाकरिता तो दावा, तिचे नाव आशाप्रकारे ज्या दिवशी सामील करून घेण्यात आले असेल, त्या दिवशी दाखल करण्यात आला असे मानण्यात येईल.

(३) दावा अनिर्णित असता कोणताही पक्षकार मरण पावेल त्याबाबतीत,– पक्षकार मरण पावेल अशा बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्वती.

(एक) अशा मुत्यूनंतर एक महिन्याच्या आत अर्ज केला असेल तर मामलेदार, मृत पक्षकाराचा वैध प्रतिनिधी कोण आहे हे संक्षिप्त चौकशी करून ठरवील आणि अशा प्रतिनिधीचे नाव अभिलेखात दाखल करून घेईल,

(दोन) असा अर्ज करण्यात आला नाही तर दावा समाप्त होईल.

(४) मामलेदार कोणत्याही व्यक्तीचे नाव प्रतिवादी म्हणून दाखल करण्याचा आदेश देईल, किंवा मृत प्रतिवादीचा वैद्य प्रतिनिधी म्हणून कोणत्याही व्यक्तीचे नाव दप्तरात दाखल करील तेव्हा, मामलेदार अशा व्यक्तीला कलम १४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोटीस देईल; आणि अशा नोटीशीत ठरविलेल्या दिनांकास न्यायचौकशीचे कामकाज चालू करण्यात येईल.

**१९.** (१) ठरविलेल्या दिवशी, किंवा ज्या दिवसापर्यंत कार्यवाही तहकूब केली असेल अशा कोणत्याही दिवशी मामलेदार कलम १६ च्या तरतुदींना अधीन राहून, त्यावेळी त्याच्यापुढे जो पुरावा असेल तो सर्व ऐकून [१][पुढील वादविषयांची न्यायचौकशी करील, म्हणजे :- सुनावणीच्या वेळी मामलेदाराने निकालात काढावयाचे मुद्दे.

(अअ) वादीने असे प्रकथन केले असेल की, त्याच्या जमिनीतून वाहणारा नैसर्गिक पाण्याचा प्रवाह प्रतिवादीने उभारलेल्या कोणत्याही व्यत्ययामुळे अडविण्यात आलेला आहे आणि त्यामुळे वादीच्या जमिनीस किंवा तिच्यावरील कोणत्याही कुरणास, झाडास किंवा पिकास नुकसान पोहोचत आहे किंवा नुकसान पोहोचण्याचा संभव आहे, तर,-

(१) निश्चित जलमार्गातून किंवा अन्य पृष्ठभागावरून वाहणारे पाणी नैसर्गिकरित्या वादीच्या जमिनीतून प्रतिवादीच्या जमिनीकडे वाहात होते किंवा कसे;

(२) अशा प्रवाहात, प्रतिवादीने त्यांस कायद्याच्या रीतसर प्राधिकाराव्यतिरिक्त अन्यथा कोणताही व्यत्यय उभारला आहे किंवा कसे ;

(३) अशा नैसर्गिक प्रवाहास अशी उभारणी करण्यात आल्यामुळे आलेला व्यत्यय, दावा दाखल करण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत झाला आहे किंवा कसे;

(४) अशा व्यत्ययामुळे वादीच्या जागेचे किंवा तीवरील कोणत्याही कुरणाचे, झाडांचे किंवा पिकांचे नुकसान झाले आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा कसे;]

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ४ द्वारे मूळ मंजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(अ) वादीने असे प्रकथन केले असेल की, कोणत्याही मालमत्तेवरील त्याचा कब्जा अवैधपणे हिरावून घेतला असेल किंवा कोणत्याही वापरहक्काला वंचित केले असेल तर,–

(१) दावा केलेल्या मालमत्तेचा कब्जा किंवा वापरहक्क वादीकडे किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीकडे किंवा त्याने जिच्यामार्फत दावा केला असेल तिच्याकडे दावा दाखल करण्यापूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी होता किंवा कसे;

(२) दावा करण्याच्यावेळी प्रतिवादीकडे कब्जा आहे किंवा कसे, आणि असेल तर त्याने तो कायद्याच्या रीतसर प्राधिकाराव्यतिरिक्त इतर रीतीने मिळविलेला आहे किंवा कसे ;

(ब) वादीने असे प्रकथन केले असेल की, त्याचा कोणत्याही मालमत्तेचा कब्जा किंवा कोणताही वापरहक्क पूर्ववत होण्यास, प्रतिवादीचा त्याबाबतचा कोणताही धारणाधिकार किंवा इतर हक्क समाप्त होणे हे कारण असेल तर,--

(१) वादीकडून किंवा त्याने ज्या व्यक्तीमार्फत दावा लावला असेल तिच्याकडून प्राप्त झालेल्या हक्कांअन्वये प्रतिवादीकडे या मालमत्तेचा कब्जा किंवा तिच्या वापर हक्काचा उपभोगाधिकार आलेला आहे किंवा कसे ;

(२) दावा दाखल करण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी असा हक्क संपला आहे किंवा कसे ;

(३) प्रतिवादी हा, दावा दाखल करण्यापूर्वी बारा वर्षांच्या आतील मुदतीत दावा केलेल्या मालमत्तेचा किंवा वापरहक्काचा, पूर्वीचा मालक किंवा ज्याची अंशतः मालक असणारी व्यक्ती आणि असा पूर्वीचा मालक किंवा अंशतः मालकी असलेल्या व्यक्तीचा वैध प्रतिनिधी नसलेली व्यक्ती आहे काय ?

(क) वादीने असे प्रकथन केले असेल की, त्या मालमत्तेचा कब्जा किंवा वापरहक्काचा उपभोगाधिकार अद्याप त्याच्याकडेच आहे परंतु प्रतिवादी त्याच्या कब्जास किंवा वापर हक्कास त्रास किंवा अडथळा आणतो किंवा त्रास किंवा अडथळा आणण्याचा त्याने प्रयत्न केला आहे--

(१) दावा लावलेली मालमत्ता किंवा वापरहक्क हे, वादीच्या किंवा त्याच्यावतीने कोणत्याही व्यक्तीच्या प्रत्यक्ष कब्जात किंवा उपभोगात आहे किंवा कसे ;

(२) प्रतिवादी हा त्याला अशा कब्जास किंवा वापरहक्कास त्रास किंवा अडथळा आणीत आहे किंवा कसे किंवा त्याने असा त्रास किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केला आहे किंवा कसे ;

(३) असा त्रास किंवा अडथळा किंवा अशा त्रासाच्या किंवा अडथळ्याच्या, प्रयत्नाची सुरुवात, दावा दाखल केल्याच्या पूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत झाली किंवा कसे.

इतर साक्षीदारांची तपासणी घेण्याचा आणि वादग्रस्त मालमत्तेची तपासणी करण्याचा मामलेदाराचा अधिकार.

(२) मामलेदारास, न्यायदानाच्या कामी मदत व्हावी म्हणून, योग्य नोटीस दिल्यानंतर ज्या व्यक्तीस समन्स काढून बोलावले नसेल किंवा हजर केले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस, पक्षकार हजर असताना समन्स काढून बोलावता किंवा त्याची साक्षीदार म्हणून तपासणी करता येईल आणि जो कोणताही दस्तऐवज कोणत्याही पक्षकाराने मागितलेला किंवा हजर केलेला नसेल तो, दस्तऐवज मागविता आणि सिद्ध करून दाखविण्यास सांगता येईल ; आणि योग्य वाटल्यास, त्यास पक्षकाराच्या समक्ष किंवा त्यांना योग्य नोटीस देऊन, वादग्रस्त मालमत्तेची जातीने तपासणी करता येईल.

[१][तो अशा तपासणीच्या वेळी दिसून आलेल्या संबद्ध मुद्यांचे टाचण, पक्षकार हजर असल्यास त्यांचे म्हणणे त्याच जागी ऐकून घेतल्यानंतर, अनावश्यक विलंब न लावता नमूद करील. ते टाचण त्या दाव्याच्या अभिलेखाचा भाग म्हणून समजण्यात येईल.]

---

[१] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २ पहिल्या अनुसूचीद्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(३) मामलेदार, प्रत्येक साक्षीदाराच्या तपासणीची कार्यवाही चालू असताना त्याच्या साक्षीच्या गोषवाऱ्याचे टाचण स्वतः लिहील किंवा त्याच्यावर सही करील आणि त्याच्या निष्कर्षाची कारणे थोडक्यात नमूद करील.

मामलेदाराने चालविलेल्या कार्यवाहीचे अभिलेख.

(४) वादविषयावरील मामलेदाराचा निष्कर्ष वादीच्या बाजुचा असेल तेव्हा, तो, कलम ५ अन्वये त्याच्याकडे निहित असलेल्या अधिकारांच्या मर्यादेबाहेर होणार नाही असा जो आदेश त्याला दाव्याच्या परिस्थितीनुसार देणे आवश्यक वाटेल असा आदेश देईल; आणि त्याचा निष्कर्ष प्रतिवादीच्या बाजुचा असेल तेव्हा, तो दावा फेटाळील. वरीलपैकी कोणत्याही बाबतीत, बजावणीच्या खर्चासह दाव्याचा खर्च, ज्याच्याविरुध्द निर्णय होईल तो देईल.

वादीच्या आणि प्रतिवादीच्या बाजुने झालेल्या निर्णयावर मामलेदाराने द्यावयाचे आदेश.

**२०.** मामलेदाराचा, प्रत्येक आदेश, मग तो वादपत्र फेटाळण्याबाबत असो, किंवा परत करण्याबाबत असो, किंवा दावा मान्य करण्याबाबत किंवा अमान्य करण्याबाबत असो, मामलेदार, तो, वादपत्रावर पृष्ठांकित करील आणि तो ताबडतोब किंवा ज्या दिवसाबाबत उभय पक्षकारांना किंवा त्यांच्या वकिलांना योग्य नोटीस देण्यात येईल अशा एखाद्या नंतरच्या दिवशी खुल्या न्यायालयात वाचून दाखवील, आणि त्या आदेशाची संक्षिप्त कारणे तो अभिलेखात नमूद करून ठेवील.

मामलेदाराने दिलेला आदेश वादपत्रावर पृष्ठांकित करणे आणि तो खुल्या न्यायालयात वाचून दाखविणे.

**२१.** (१) मामलेदाराचा निर्णय [१][व्यत्यय दूर करण्याबाबत किंवा] कब्जा देण्याबाबत किंवा वापरहक्क पूर्ववत करण्याबाबत असेल तेव्हा तो, तो निर्णय, ग्राम अधिकाऱ्यास किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यास किंवा इतर व्यक्तीला किंवा अन्यप्रकारे त्यास योग्य वाटतील असे आदेश देऊन, अमलात आणील ;

मामलेदाराचा निर्णय अमलात कसा आणावा.

परंतु, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, [२][कोणत्याही जमिनीवर उभारण्यात आलेला व्यत्यय काढून टाकण्याचा किंवा] जमिनीचा कब्जा परत देण्याचा निर्णय मामलेदार नमूद करील त्यावेळी, त्या जमिनीवर प्रतिवादीने किंवा प्रतिवादीच्या खर्चाने पेरलेले पीक असेल, आणि ते चांगल्या हेतूने पेरले असल्याबद्दल मामलेदाराची खात्री होईल तेव्हा, मामलेदारास, पुढीलपैकी कोणतीही एक गोष्ट करण्यात येईपर्यंत, त्या जमिनीचा कब्जा मागणाऱ्या वादीस तो परत देण्याचे तहकूब करण्याबाबत आदेश देता येईल, आणि प्रतिवादीने त्या कारणाकरिता अर्ज करून, दाव्याच्या खर्चाबद्दल पुरेसे तारणपत्र सादर केले किंवा न्यायालयात पुरेशी रक्कम अनामत ठेवली तर, मामलेदार तसा आदेश देईल.--

वाढणाऱ्या पिकांबाबत परंतुक.

(अ) त्या पिकाची अशावेळी जी किंमत असेल तिला अनुसरून आणि प्रतिवादीने चालू वर्षासाठी सरकारी आकरणीचे जे कोणतेही हप्ते भरले असतील त्यांचा समावेश करून, मामलेदाराने दिलेल्या आदेशान्वये ठरविलेल्या किंमतीस वादी ते पीक घेण्याचे कबूल करीतोपर्यंत; किंवा

(ब) वादी हा अशा ठरविलेल्या किंमतीने ते पीक घेण्यास नाराज असेल तेव्हा, प्रतिवादीला ते पीक गोळा करण्यासाठी पुरेसा ठरेल असा कालावधी संपेपर्यंत,

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ५ (१) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ (१) (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

या पोट-कलमाच्या परंतुकाच्या खंड (अ) अन्वये ठरविलेल्या किंमतीची कोणतीही रक्कम, प्रतिवादीस, मामलेदाराच्यामार्फत देण्यात येईल, आणि ती वादीकडून, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

मनाईहुकूम बजावण्याची पद्धत.

(२) मामलेदाराचा निर्णय, मनाईहुकूम देण्याबाबत असेल तेव्हा तो, ती [१][यथास्थिति, अनुसूची **बब** च्या किंवा **क** च्या नमुन्यात तयार करण्याची] व्यवस्था करील आणि प्रतिवादी हजर असेल तर त्यास तेथेच व त्याचवेळी देईल किंवा सादर करील, किंवा प्रतिवादी हजर नसेल तर, ती त्याच्यावर बजावण्यासाठी, ग्राम अधिकाऱ्याकडे, किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याकडे पाठवील.

देण्यासंबंधी निर्णय दिलेल्या खर्चाची वसुली.

(३) मामलेदार, खर्च देण्याचा निर्णय देईल तेव्हा, बजावणीचा खर्च धरून असा खर्च, तो ज्यांच्याकडून देण्याबाबत आदेश दिला असेल अशा पक्षकाराकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

मनाई-हुकूमाची अवज्ञा केल्या-बद्दल शिक्षा कशी करावी.

(४) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या मनाईहुकूमाची जी कोणतीही व्यक्ती अवज्ञा करील ती, [२][भारतीय दंड संहिता,] कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असेल. १८६० चा ४५.

पक्षकारांच्या हक्कास बाध न येता कब्जा द्यावयाचा.

**२२.** [३][कलम २३, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, एखादा व्यत्यय काढून टाकण्यासाठी ज्या पक्षकाराच्या नावाने मामलेदार आदेश देईल, किंवा ज्या पक्षकारास मामलेदार कब्जा देईल किंवा ज्याचा वापरहक्क पूर्ववत करील, किंवा ज्या पक्षकाराच्या नावाने मनाईहुकूम काढला असेल तो पक्षकार सक्षम दिवाणी न्यायालयाकडून इतर रीतीने हुकूमनामा किंवा आदेश देण्यात येईपर्यंत किंवा अशा न्यायालयाकडून काढून टाकण्यात येईपर्यंत त्याच्या जमिनीच्या पृष्ठभागावरील पाण्याचा प्रवाह लगतच्या जमिनीवर व्यत्यय येणार नाही अशारीतीने वाहू देईल किंवा त्याचा कब्जा किंवा, यथास्थिति, वापर करणे चालू ठेवील] :

परंतु, प्रथमतः असे की, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, ज्या पक्षकाराविरुद्ध मामलेदाराने निर्णय दिला असेल, त्या पक्षकारास ज्या मुदतीपर्यंत कोणत्याही मालमत्तेच्या कब्जापासून त्यास दूर ठेवले असेल किंवा कोणत्याही वापरहक्काचा उपभोग घेऊ दिला नसेल त्या मुदतीतील उत्पन्न, सक्षम दिवाणी न्यायालयात दावा करून वसूल करण्यास, प्रतिबंध होणार नाही :

परंतु दुसरे असे की, कोणत्याही मालमत्तेच्या कब्जाबाबत किंवा वापर हक्काबाबत कलम २१, पोट-कलम (१) च्या परंतुकाअन्वये व्यवस्था केलेल्या कोणत्याही पिकावरील हक्काबाबत किंवा त्याच्या किंमतीबाबत मामलेदाराने दिलेला निर्णय हा, कोणत्याही दिवाणी न्यायालयात त्याच पक्षकाराच्या किंवा त्याच्यातर्फे दावा करणाऱ्या इतर व्यक्तींच्या दरम्यान नंतर होणाऱ्या कोणत्याही दाव्यात किंवा इतर कार्यवाहीत निर्णायक आहे असे समजण्यात येणार नाही.

अपिलास प्रतिबंध.

**२३.** (१) या अधिनियमाअन्वये मामलेदाराने दिलेल्या कोणत्याही आदेशावर अपील करता येणार नाही.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ५ (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] केंद्रीय अधिनियम.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) परंतु जिल्हाधिकाऱ्यास या अधिनियमाखालील कोणत्याही दाव्याचा अभिलेख मागविता आणि त्याची तपासणी करता येईल, आणि अशा दाव्यातील कोणतेही कामकाज, निष्कर्ष किंवा आदेश अवैध किंवा अयोग्य आहे असे त्यास वाटले तर, त्याला पक्षकारास योग्य नोटीस दिल्यानंतर, या अधिनियमांशी विसंगत नसेल असा त्याला योग्य वाटेल तो आदेश देता येईल. मामलेदाराने केलेल्या कार्यवाहीची फेरतपासणी करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

[१][(२-अ) जिल्हाधिकाऱ्यास या कलमान्वये त्याला प्रदान केलेले अधिकार त्याला दुय्यम असलेला कोणताही [२][सहायक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहायक आयुक्त] याकडे सोपविता येतील.] जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार सोपवून देणे.

(३) जिल्हाधिकारी [२][ सहायक जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा सहायक आयुक्त] याने या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही केली तर, तो न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. जिल्हाधिकारी हा न्यायालय आहे असे मानणे.

**२४.** [सिंध प्रांताच्या न्यायिक कमिशनर न्यायालयाचे अधिकार] भारतीय विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हे कलम वगळण्यात आले.

१८६० चा ४५. **२५.** कोणत्याही वादीस, या अधिनियमाअन्वयेचे कोणतेही वादपत्र कोणत्याही महत्त्वाच्या बाबतीत खोटे आहे हे माहित असून किंवा तसे वाटत असून किंवा ते खरे आहे असे वाटत नसताही तो त्या वादपत्रावर सही करील आणि त्याचे सत्यापन करील तर त्याने [३][भारतीय दंड संहिता,] कलम १९३ अन्वये शिक्षेस पात्र असा अपराध केला आहे, असे मानण्यात येईल. खोट्या वादपत्राचे सत्यापन करण्याबद्दल शिक्षा.

**२६.** (अ) कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने त्याच्या पदाच्या नात्याने जे कोणतेही कृत्य केले असेल किंवा केले असल्याचे अभिप्रेत असेल त्या कृत्याबद्दल [४][शासनाविरुद्ध किंवा शासनाच्या अशा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध,] त्याने ते कृत्य, त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये योग्यरीत्या घटीत केलेल्या व्यवस्थापकाच्या किंवा पालकाच्या नात्याने केलेले असल्यास ते खेरीजकरून; अथवा विवक्षित दाव्यांना प्रतिबंध.

१८९८ चा ५. (ब) [५][कोणताही व्यत्यय काढून टाकल्याच्या किंवा] कोणताही कब्जा काढून घेतल्याच्या किंवा कोणत्याही कब्जास हरकत आणल्याच्या ज्या बाबतीत, या अधिनियमाअन्वयेच्या किंवा दिवाणी न्यायालयाच्या, किंवा + दंड प्रक्रिया संहिता, १८९८, च्या प्रकरण १२ अन्वये च्या पूर्वीच्या कामकाजात वादी किंवा त्यात हितसंबंध असलेला पूर्वाधिकारी पक्षकार होता त्याबाबतीत,

---

[१] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ (अ) तसेच सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२ च्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (५) द्वारे "सहायक कलेक्टर किंवा डेप्युटी कलेक्टर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] केंद्रीय अधिनियम.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "राजाविरुद्ध किंवा राजाच्या अशा कोणत्याही नोकराविरुद्ध" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

† आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

या अधिनियमाअन्वये दावा दाखल करण्यात येणार नाही. १९५८ चा मुंबई ४.

निरसन आणि व्यावृत्ति. [1][**२७.***  मामलेदार न्यायालय (विस्तार) अधिनियम, १९५७ याद्वारे हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू करण्यात आला आहे त्या भागात त्याचा प्रारंभ झाल्यावर, सौराष्ट्र मामलेदार न्यायालय अध्यादेश, १९४८ आणि सुधारण्यात आलेला व मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशात लागू करण्यात आलेला मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ हे त्या भागात अशा प्रारंभापासून निरसित होतील ; १९४८ चा सौराष्ट्र अध्या. क्र. ५२. १९०६ चा मुंबई २.

परंतु, अशारीतीने कोणताही अधिनियम रद्द झालेला असला तरीही, अशा रितीने रद्द केलेल्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याअन्वये (केलेल्या कोणत्याही नेमणुका, घटीत केलेली मामलेदाराची कोणतीही न्यायालये, त्यांच्या प्रदेशांच्या ठरविलेल्या हद्दी, अशा न्यायालयांनी दिलेले आदेश, अशा न्यायालयांपुढे किंवा जिल्हाधिकाऱ्यांपुढे किंवा इतर प्राधिकाऱ्यांपुढे प्रलंबित असलेले कामकाज आणि सरकारने किंवा जिल्हाधिकाऱ्याने सोपविलेले अधिकार यांसह) केलेले कोणतेही कृत्य किंवा केलेली कोणतीही उपाययोजना, असे केलेले कृत्य किंवा केलेली उपाययोजना या अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, जणूकाही हा अधिनियम तेव्हा अमलात असल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेले कृत्य, केलेली उपाययोजना, केलेली नेमणूक, घटीत केलेली, ठरविलेली, प्रलंबित असलेले किंवा केलेले असल्याचे मानण्यात येईल ; आणि त्याप्रमाणे अशा कोणत्याही न्यायालयापुढे किंवा जिल्हाधिकाऱ्यापुढे किंवा इतर प्राधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेले सर्व कामकाज या अधिनियमाच्या तरतुदींनुसार चालू ठेवण्यात व निकालात काढण्यात येईल.]

---

[1] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ (६) द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

* महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये हे कलम फेरबदल विरहित ठेवण्यात आले.

## अनुसूची अ

## कलम १४ अन्वये प्रतिवादीला द्यावयाच्या नोटिशीचा नमुना

| न्यायालयाचा शिक्का |
|---|

**दाव्याचा क्रमांक**

........................................ च्या मामलेदाराच्या न्यायालयात.

वादी;

प्रतिवादी.

प्रतिवादी.--(नाव, वय, धर्म, जात, व्यवसाय आणि राहण्याचे ठिकाण) यांस,

**ज्याअर्थी,** (येथे वादीचे नाव, वय, धर्म, जात, व्यवसाय आणि राहण्याचे ठिकाण लिहावे) मागे तुमच्या विरुध्द (येथे वादपत्राचा तपशील लिहावा) याबाबत या न्यायालयात दावा दाखल केला आहे :

**त्याअर्थी,** उपरिनिर्दिष्ट वादीस जबाब देण्यासाठी तुम्ही स्वतः किंवा योग्यरित्या अधिकार दिलेल्या अभिकर्त्यामार्फत ............... या गावी ............... या न्यायालयात ............... या दिनांकास ............... वाजता हजर व्हावे यासाठी याअन्वये अधिपत्र काढून बोलविण्यात येत आहे; आणि, त्या दिनांकास वादपत्राची अखेरची विल्हेवाट करण्यात येणार असल्यामुळे, वरील ठरविलेल्या वेळी आणि जागी तुम्ही तुमचे दस्तऐवज सादर करण्याची आणि तुमचे साक्षीदार हजर ठेवण्याची व्यवस्था करावी; आणि तुम्हास याअन्वये नोटीस देण्यात येते की, पूर्वी सांगितलेल्या वेळी आणि जागी असे हजर राहण्यात तुम्ही कसूर कराल तर, तुमच्या आणि तुमच्या अभिकर्त्याच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज दिनांक माहे सन १९ .

(सही)
मामलेदार.

**टीप.--**तुमच्या साक्षीदारांना, न्यायालयाकडून अधिपत्र काढून बोलविण्यात यावे अशी तुमची इच्छा असेल तर वाजवी मुदतीत अधिपत्रे बजाविता यावी म्हणून तशा अर्थाचा अर्ज तुम्ही यात निर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी विलंब न लावता करावा.

## अनुसूची ब

## कलम १६ अन्वये काढावयाच्या नोटिशीचा नमुना

| |
|---|
| न्यायालयाचा शिक्का |

**दाव्याचा क्रमांक**

........................................................ च्या मामलेदाराच्या न्यायालयात.

वादी;

प्रतिवादी.

वादी (किंवा यथास्थिति, प्रतिवादी) यांस,

**ज्याअर्थी,**.................................याने या न्यायालयात दाखल केलेल्या उपरिनिर्दिष्ट दाव्यांत गेल्या ........................ महिन्याच्या ........................या दिनांकास न्यायालयाने ........................ असा आदेश दिला असून उक्त वादीने (किंवा यथास्थिति, प्रतिवादीने), (येथे कारणे लिहावी) या कारणांकरिता प्रकरणाची फेरसुनावणी करण्याबद्दल या न्यायालयाकडे ........................महिन्याच्या ........................ या दिनांकांस अर्ज केला आहे ;

**त्याअर्थी,** तुम्हास अशी नोटीस देण्यात येते की, ........................ गावी ........................ महिन्याच्या ........................ या दिनांकास ........................ वाजता, उक्त अर्जाची सुनावणी होऊन त्याचा निर्णय देण्यात येईल, आणि तुम्हास याअन्वये फर्माविण्यात येते की, उक्त वेळी आणि जागी तुम्ही स्वत: किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यात कसूर कराल तर, तुमच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी करून निर्णय देण्यात येईल, आणि तो अर्ज मंजूर केला तर, दाव्याची फेरसुनावणी करण्यासाठी त्यानंतर जागा आणि वेळ ठरविण्यात येईल.

आज दिनांक माहे सन १९ .

(सही)
मामलेदार.

## [१][अनुसूची बब

## कलम २१, पोट-कलम (२) अन्वये काढावयाच्या मनाईहुकूमाचा नमुना

| |
|---|
| न्यायालयाचा<br>शिक्का |

**दाव्याचा क्रमांक**

........................................................................................ च्या मामलेदाराच्या न्यायालयात.

वादी;

प्रतिवादी.

प्रतिवादी ................................................................................ यांस,

**ज्याअर्थी,** उपरिनिर्दिष्ट दाव्यात, द्वारे (येथे मालमत्तेचे आणि सिध्द झाल्याचे आढळून झालेल्या, उभारलेल्या किंवा उभारण्याचा प्रयत्न केलेल्या व्यत्ययाचे वर्णन लिहा). वादीच्या खाली निर्देश केलेल्या मालमत्तेत, नैसर्गिक रीतीने उफळणाऱ्या किंवा तीवर पडणाऱ्या पृष्ठ भागांवरील पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहास तुम्ही व्यत्यय आणला आहे असे आज रोजी न्यायालयास आढळून आले आहे ;

**त्याअर्थी,** तुम्हांस सक्षम दिवाणी न्यायालयाच्या प्राधिकारांवाचून उक्त वादीच्या उक्त मालमत्तेतून तुमच्या मालमत्तेकडे पृष्ठभागावरून वाहणाऱ्या नैसर्गिक प्रवाहास कोणताही व्यत्यय आणण्यास किंवा आणण्याचा प्रयत्न करण्यास मनाई करण्यात येत आहे (आवश्यक असल्यास, जो विशिष्ट प्रकारचा व्यत्यय न आणण्याबद्दल प्रतिवादीस आज्ञा केली असेल तो व्यत्यय नमूद करावा).

आज दिनांक माहे सन १९ .

(सही)
मामलेदार.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६, कलम ८ द्वारे अनुसूची बब समाविष्ट करण्यात आली.

## अनुसूची क

### कलम २१, पोट-कलम (२) अन्वये काढावयाच्या मनाईहुकूमाचा नमुना

न्यायालयाचा शिक्का

**दाव्याचा क्रमांक**

........................................................ च्या मामलेदाराच्या न्यायालयात.

वादी;

प्रतिवादी.

प्रतिवादी ........................................................ यांस,

**ज्याअर्थी,** उपरिनिर्दिष्ट दाव्यात न्यायालयास असे आढळून आले आहे की, खाली वर्णन केलेली मालमत्ता उक्त वादीच्या कब्जात असण्यास (किंवा, यथास्थिति, पाण्याचा खाली वर्णिलेला वापर करण्यास किंवा रस्त्याचा खाली वर्णिलेला वापर करण्यास) तुम्ही (येथे सिध्द झालेला त्रास किंवा अडथळा किंवा त्रासाचा किंवा अडथळ्याचा प्रयत्न यांचा तपशील लिहा.) ........................................................

........................................................

करून त्रास किंवा अडथळा आणला आहे (किंवा त्रासाचा किंवा अडथळ्याचा प्रयत्न केला आहे).

**त्याअर्थी,** सक्षम दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीखेरीज अन्यथा उक्त मालमत्ता (किंवा, यथास्थिति अन्यथा) उक्त वादीच्या कब्जात असण्यास (आवश्यकता असल्यास, येथे कोणत्या प्रकारचा त्रास किंवा अडथळा पुन्हा न करण्याची प्रतिवादीस आज्ञा दिली आहे ते लिहावे) त्रास किंवा अडथळा आणण्याचा आणखी प्रयत्न करण्यास, तुम्हास याअन्वये प्रतिबंध करण्यात येत आहे.

आज दिनांक माहे सन १९ .

(सही.)
मामलेदार.

एच ४८१-(३,२५९ पु.)-१०.२०१५

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते